# अहवाल

# <u>एक दिवसीय कार्यशाळा</u>

## ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व अर्थशास्त्र पदवी विषयातील अभ्यासक्रम बदल’

अर्थशास्त्र अभ्यास मंडळ रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर, सेठ नर्सिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर व आर्ट्स कॉलेज सिहोरा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०६/०७/२०२४ शुक्रवार ला “National Education Policy (NEP-2020) in the context of Economics curriculum” Under Graduate B.A. Programme (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व अर्थशास्त्र पदवी विषयातील अभ्यासक्रम बदल) या विषयावर एक दिवसीय विद्यापीठ स्तरावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन रातुम नागपूर विद्यापीठातील पदयुत्तर अर्थशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. आर. वाय. माहोरे सर यांच्या हस्ते व रातुम नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन पाटील सर यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम सर, प्रमुख पाहुणे म्हणून आर्ट्स कॉलेज सिहोराचे प्राचार्य डॉ. सचिन चापले सर व जीवन विकास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे सर प्रामुख्याने उपस्थित होते.

उद्घाटनीय कार्यक्रमामध्ये कार्यक्रमाचे उद्घाटक, अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी केंद्रबिंदू असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शिक्षकाची भूमिका महत्त्वाची राहणार आहे त्यामुळे या धोरणाकडे सकारात्मक दृष्टिने पहावे’ असे प्रतिपादन पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. आर. वाय. माहोरे यांनी केले आहे. अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. गजानन पाटील यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अर्थशास्त्र विषयामध्ये झालेले बदल निदर्शनात आणून देत व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रमातील उपक्रम महत्त्वाचे असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मसराम म्हणाले की, ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी गरजेचे असून त्याबद्दलची कार्यशाळा घेऊन प्राध्यापक व विद्यार्थ्यांना माहिती देणे महत्त्वाचे होते हे लक्षात घेऊन या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले

त्यामुळे निश्चितच आमच्या महाविद्यालयाच्या वाटचालीमध्ये या कार्यशाळेचा फायदा होईल' याप्रसंगी डॉ. राजू श्रीरामे यांचेही मार्गदर्शन लाभले.

"Discussion on the Syllabus & Examination Scheme of B.A. (Economics) Major and Minor" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. आर. वाय. माहोरे तर प्रमुख पाहुणे डॉ. गजानन पाटील, डॉ. राजू श्रीरामे होते. या सत्रामध्ये अभ्यासक्रमाचे स्वरूप कसे असेल, विद्यार्थ्यांसाठी कोणकोणत्या संधी उपलब्ध होतील, क्रेडीट वाटप, शिक्षकांचा कार्यभार, परीक्षा पद्धती, मेजर, मायनर, ओपन इलेक्टीव विषय इत्यादी विषयावर मा. अतिथींचे मार्गदर्शन लाभले. या सत्रामध्ये उपस्थित प्राध्यापकांच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन मा. अतिथींनी केले.

या कार्यशाळेसाठी पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील डॉ. समित माहोरे, अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या सदस्या डॉ. ज्योती पांडे व नागपूर विद्यापीठाअंतर्गत येणा-या विविध महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे ५९ प्राध्यापक, महाविद्यालयातील पदव्युत्तर अर्थशात्र विषयाचे २५ विद्यार्थी व महाविद्यालयीन २० प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील कला शाखेचे प्रभारी व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयंतकुमार मस्के यांनी केले. सूत्रसंचालन आट्र्स कॉलेज, सिहोरा येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. मदन प्रधान व संताजी महाविद्यालय पालांदूर येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवी पाटेकर यांनी केले. तर डॉ.सचिन वेरुळकर व प्रा. अरुण चव्हाण यांनी आभार मानले.















# देशोन्नती

## राष्ट्रीय शैक्षणिक एक दिवसीय धोरणाबाबत कार्यशाळा



सिहोरा : गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित सेठ नर्सिंगदास मोर कला वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व अर्थशास्त्र पदवी विषयातील अभ्यासक्रम बदल' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर व आर्ट्स कॉलेज सिहोरा यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन रातुम नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. आर. वाय. माहोरे यांच्या हस्ते व रातुम नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतन मसराम, प्रमुख पाहुणे म्हणून आर्ट्स कॉलेज सिहोराचे प्राचार्य डॉ. सचिन चापले व जीवन विकास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे आवर्जून उपस्थित होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी केंद्रबिंदू असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शिक्षकाची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. त्यामुळे या धोरणाकडे सकारात्मक दृष्टीने पहावे असे प्रतिपादन पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, रातुम नागपूर विद्यापीठाचे माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. आर. वाय. माहोरे यांनी केले आहे. अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. गजानन पाटील यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अर्थशास्त्र विषयामध्ये झालेले बदल निदर्शनास आणून देत काळाची सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रमातील उपक्रम महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

या कार्यशाळेसाठी पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर येथील डॉ. सामिल माहोरे व नागपूर विद्यापीठांतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील कला शाखेचे प्रभारी व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. ज्यंत मस्के यांनी केले. सूत्रसंचालन आर्ट्स कॉलेज, सिहोरा येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. मदन प्रधान व स्वाजी महाविद्यालय पालांदूर येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवी पाटेकर यांनी केले. तर डॉ. सचिन वेरूळकर व प्रा. अरुण चव्हाण यांनी आभार मानले.



दैनिक भास्कर

## राष्ट्रीय शिक्षा नीति पर कार्यशाला 6 को

संवाददाता | सिहोरा (भंडारा). गोंदिया शिक्षा संस्था द्वारा संचालित सेठ नर्सिंगदास मोर आर्ट्स एन्ड कॉमर्स एवं गोदावरी देवी सराफ विज्ञान कॉलेज में 6 जुलाई, शनिवार सुबह 10 बजे राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 एवं अर्थशास्त्र डिग्री में पाठ्यक्रम परिवर्तन विषय पर एक दिवसीय कार्यशाला का आयोजन कॉलेज सभागार में किया गया है। कार्यशाला का आयोजन नागपुर यूनिवर्सिटी के अर्थशास्त्र अभ्यासमंडल और आर्ट्स कॉलेज सिहोरा के संयुक्त तत्वावधान में किया गया है। मार्गदर्शक के रूप में राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. वाय. माहोरे, अण्णासाहेब गुंडेवार कॉलेज के प्राचार्य डॉ. गजानन पाटिल, डॉ. जीवन विकास कॉलेज देवग्राम उप प्राचार्य राजू श्रीरामे रहेंगे। कार्यशाला के लिए नागपुर विश्वविद्यालय के डिग्री कॉलेज में पूर्णकालिक प्रोफेसर, अंशकालिक प्रोफेसर, संशोधक छात्र और इस विषय से संबंधित सभी प्रोफेसर भाग लें। ऐसा आह्वान प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम एवं प्राचार्य डॉ. सचिन चापले ने किया है।

## एस. एन. मोर कॉलेज, तुमसर व आर्ट्स कॉलेज, सिहोराच्या संयुक्त विद्यमाने तुमसर येथे कार्यशाळेचे आयोजन

## एस. एन. मोर कॉलेज, तुमसर व आर्ट्स कॉलेज, सिहोराच्या संयुक्त विद्यमाने तुमसर येथे कार्यशाळेचे आयोजन

नवजीवन वृत्तसेवा

सिहोरा : गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित सेठ नर्सिंगदास मोर कला-वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालयात 6 जुलै रोजी स. 10 वा. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व अर्थशास्त्र पदवी विषयातील अभ्यासक्रमा बदल' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा तुमसर महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

अर्थशास्त्र अभ्यास मंडळ रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर व आर्ट्स कॉलेज सिहोरा यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळा डॉ. आर. वाय. माहोरे, माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, रातुम, नागपूर विद्यापीठ नागपूर, डॉ. गजानन पाटील, प्राचार्य, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर व अध्यक्ष अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, नागपूर विद्यापीठ नागपूर त्याचप्रमाणे डॉ. राजू श्रीरामे, उपप्राचार्य, जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

तरी या कार्यशाळेसाठी नागपूर विद्यापीठातील पदवी महाविद्यालयाला अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन करणाऱ्या पूर्णवेळ प्राध्यापक, अंशकालीन प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी तसेच या विषयाशी संबंधित सर्व प्राध्यापक वर्गांनी सहभागी व्हावे असे आव्हान प्रा. डॉ. चेतनकुमार मसराम व प्रा. डॉ. सचिन चापले यांनी केले आहे.

# नवराष्ट्र

## अर्थशास्त्रावर एकदिवसीय कार्यशाळा

Bhandara Edition Edition
Jul 11, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

# एस.एन.मोर कॉलेज व आर्ट्स कॉलेज संयुक्त कार्यशाळेचे आयोजन



∗ सचित्र न्यूज वृत्तसेवा ∗

**सिहोरा** गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित सेठ नर्सिंगदास मोर कला-वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालयात दि. 6 जुलै रोजी स. 10 वाजता 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व अर्थशास्त्र पदवी विषयातील अभ्यासक्रमा बदल' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा तुमसर महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर व आर्ट्स कॉलेज सिहोरा यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळा डॉ. आर. वाय. माहोरे माजी प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, रातुम, नागपूर विद्यापीठ नागपूर, डॉ. गजानन पाटील प्राचार्य अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर व अध्यक्ष अर्थशास्त्र अभ्यास मंडळ नागपूर विद्यापीठ नागपूर, त्याचप्रमाणे डॉ. राजू श्रीरामे उपप्राचार्य, जीवन विकास महाविद्यालय देवग्राम, या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी या कार्यशाळेसाठी नागपूर विद्यापीठातील पदवी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन करणाऱ्या पूर्णवेळ प्राध्यापक, अंशकालीन प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी तसेच या विषयाशी संबंधित सर्व प्राध्यापक वर्गांनी सहभागी व्हावे असे आव्हान प्रा. डॉ. चेतनकुमार मसराम व प्रा. डॉ. सचिन चापले यांनी केले आहे.

**नवराष्ट्र**

**# QUICK NEWS**

## मोर महाविद्यालयात कार्यशाळा

**सिहोरा.** एस. एन. मोर महाविद्यालय तुमसर व आर्ट्स कॉलेज, सिहोरा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. 6) सकाळी 10 वाजता 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व अर्थशास्त्र पदवी विषयातील अभ्यासक्रम बदल' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा एस. एन. मोर महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केली आहे. यावेळी मार्गदर्शक डॉ. आर. वाय. माहोरे, प्राचार्य डॉ. गजानन पाटील, डॉ. राजू श्रीरामे यांचे मार्गदर्शन लाभेल. अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम, प्राचार्य डॉ. सचिन चापले यांनी केले आहे.

**PROGRAMME SHEDULE**

| | |
|---|---|
| Registration & Tea | 10.00 am to 10.30 am |
| Inagural Function | 10.30 am to 11.30 am |
| Introduction to NEP-2020, Expert talk & Discussions on curriculum & queries | 11.30 pm to 01.30 pm Session-I |
| Valedictory function & distribution of Certificates | 01.30 pm to 02.00 pm |
| Lunch | 2.00 pm to 3.00 pm |

**RTMNU BOS MEMBERS IN ECONOMICS**

| Dr. Gajanan B. Patil, Chairman | |
|---|---|
| Dr. Satyapriya H. Indurwade | Dr. Vijay Bansod |
| Dr. Ganesh S. Maywade | Dr. Shiwaji Dhage |
| Dr. Raju G. Shrirame | Dr. Madan G. Pradhan |
| Dr. Samit Mahore | Dr. Bibhuti R. Mishra |
| Dr. Ramesh Joshi | Shri. Pawan T. Katanker |
| Dr. Jagdish Hatwar | Mr. Rajarao P. R. |
| Dr. Jyoti Pande | Ku. Saniya K. Subran |

**WORKSHOP ORGANIZING COMMITTEE**

| | |
|---|---|
| Dr. Sachin Werulkar | Dr. Manoj Sarode |
| Prof. Arun Chavhan | Dr. Chandrashekhar Bheje |
| Prof. Amol Khandwe | Dr. Jaykumar Kshirsagar |

RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY, NAGPUR
BOARD OF STUDIES - ECONOMICS
&
DEPARTMENT OF ECONOMICS


SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE, TUMSAR, DIST. BHANDARA
&
ARTS COLLEGE, SIHORA, TAH. TUMSAR, DIST. BHANDARA

*Organises*
*One Day Workshop on*

**"NATIONAL EDUCATION POLICY (NEP-2020) IN THE CONTEXT OF ECONOMICS CURRICULUM"**

**Under Graduate B.A. Programme**

*Date* : 6th July 2024 at Time: 10.00 am to 03.00 pm
Venue : New Conference Hall of the S. N. Mor College, Tumsar
Registration Fee:- Rs. 300 (To be submitted at Registration Counter)



**Dr. J. M. Maskey**
HOD, Economics &
Arts Faculty Incharge
S.N. Mor College, Tumsar

Organizer
WELCOME!

**Dr. M. G. Pradhan**
HOD, Economics &
IQAC Coordinator
Arts College, Sihora, Tah. Tumsar

**INAUGURAL FUNCTION**

Time : 10:30 am to 11:30 pm

-: Chairman :-
**Hon'ble Dr. C. B. Masram**
Principal, S. N. Mor College, Tumsar

-: Inaugurator :-
**Hon'ble Dr. R. Y. Mahore**
Ex.-HOD, PGTD Economics, RTMNU, Nagpur

-: Chief Guest :-
**Hon'ble Dr. Gajanan Patil**
Chairman, Board of Studies in Economics, RTMNU, Nagpur
Principal, Annasaheb Gundewar College, Nagpur

-: Guest of Honor :-
**Hon'ble Dr. Sachin H. Chaple**
Principal, Arts College, Sihora, Tah. Tumsar

**SESSION**

Time : 11:30 pm to 01:30 pm

**Discussion on the Syllabus & Examination Scheme of B.A. (Economics) Major and Minor**

-: Chairman :-
**Hon'ble Dr. R. Y. Mahore**
Ex.-HOD, PGTD Economics, RTMNU, Nagpur

-: Chief Guest :-
**Hon'ble Dr. Gajanan Patil**
Chairman, BOS in Economics, RTMNU, Nagpur
Principal, Annasaheb Gundewar College, Nagpur

-: Guest of Honor :-
**Hon'ble Dr. Raju Shrirame**
Vice-Principal, Jeevan Vikas Mahavidyalaya, Devgram

**Valedictory Function**

-: Chairman :-
**Dr. C. B. Masram**
Principal, S. N. Mor College, Tumsar

-: Chief Guest :-
**Dr. R. Y. Mahore**
Ex.-HOD, PGTD Economics, RTMNU, Nagpur

-: Chief Guest :-
**Dr. Gajanan Patil**
Chairman, BOS in Economics, RTMNU, Nagpur

-: In Presence of :-
**Dr. Ganesh Mywade**
Vice-Principal, Sant Gadge Maharaj Mahavidyalaya, Hingna, Dist. Nagpur

-: In Presence of :-
**Dr. Raju Shrirame**
Vice-Principal, Jeevan Vikas Mahavidyalaya, Devgram

आयोजक

डॉ. जयंतकुमार मस्के
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर

डॉ. मदन प्रधान
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
आर्टस् कॉलेज सिहोरा, तह तुमसर